

# महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन



# २२ वे राज्यव्यापी द्विवार्षिक अधिवेशन

## दि. २९ व ३० एप्रिल, २०२३

### स्थळ : 'सुवर्णभूमी', कोल्हापूर मुख्य प्रवेशद्वाराजवळ, शिरोली टोल नाका, कोल्हापूर

वीज कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,

"क्रांतीचे चक्र अर्धेच फिरले आहे, समाजातील बहुसंख्य वर्ग जो सामाजिकदृष्ट्या शोषित आहे, त्याच्या संपूर्ण प्रगतीशिवाय खरी क्रांती होणार नाही आणि हे क्रांतीचे चक्र आम्हीच फिरवू!" डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या या अपेक्षेनुसार कामगार क्रांतीचे चक्र आसासह पूर्ण फिरविण्यासाठी महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना ही राज्यातच नव्हे; तर संपूर्ण देशात अग्रेसर झाली आहे. याकरिता राजर्षी शाहू छत्रपती महाराज यांच्या सामाजिक क्रांतीच्या विचारांनी पावन झालेल्या कोल्हापूर नगरीत २२वे राज्यव्यापी द्विवार्षिक अधिवेशन दि. २९ व ३० एप्रिल २०२३ रोजी संपन्न होत आहे. महाराष्ट्रातीलच नव्हे, तर देशाच्या कामगार चळवळीला योग्य दिशा देण्याच्या दृष्टिकोणातून हे अधिवेशन महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केवळ भारताचे संविधानच निर्माण केले नाही; तर देशातील कामगारांना सामाजिक व आर्थिक न्याय मिळवून देण्यासाठी आज अस्तित्वात असलेले सर्व कामगार कायदे निर्माण केले किंवा त्यात कामगारांच्या हितरक्षणार्थ सुधारणा केल्या. परंतु खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना या क्रांतीकार्यामध्ये प्रस्थापित करण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांच्या पुढाकारातून माणगाव येथे दि. २१ व २२ मार्च १९२० रोजी भरलेली 'बहिष्कृत वर्ग परिषद' मैलाचा दगड ठरली. या परिषदेत राजर्षी शाहू महाराज म्हणाले, "बहिष्कृत प्रजाजनांनो, तुम्ही तुमचा पुढारी शोधून काढल्याबद्दल मी तुमचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो. माझी खात्री आहे की, डॉ. आंबेडकर हे तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत. इतकेच नव्हे तर अशी एकवेळ येईल की, ते सर्व हिंदुस्थानचे पुढारी होतील."

माणगाव परिषदेमध्ये जे ठराव पारित करण्यात आले, त्याचेच रूपांतर पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजन समाजाच्या संविधानिक हक्कांमध्ये केले. दुसऱ्या अर्थाने स्वतंत्र भारतामध्ये श्रमिक बहुजन समाजाला जे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व सेवाविषयक हक्क प्राप्त झाले त्याची मागणी सर्वप्रथम सार्वजनिकरित्या माणगाव परिषदेद्वारे करण्यात आली. विषमतावादी व्यवस्थेतून समतेकडे वाटचाल होण्यासाठी म्हणूनच माणगाव परिषद एक ऐतिहासिक व क्रांतीकारी ठरली. माणगाव परिषदेपासून सुरू झालेला सामाजिक क्रांतीचा लढा यशस्वी करण्यासाठी व भारतातील कामगार / कर्मचाऱ्यांच्या आगामी लढ्याची दिशा निश्चित करण्यासाठी या अधिवेशनामध्ये जे विविध विषयांवर गंभीर असे विचारमंथन होणार आहे, ते कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा व नवी प्रेरणा देणारे ठरणार आहे.

या देशाचा कामगार क्रांती लढा महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीने सर्व प्रकारच्या शोषणावर केलेल्या प्रहारातून निर्माण झाला. आद्य कामगार पुढारी नारायण मेघाजी लोखंडे यांनी त्याचे नेतृत्व केले व कामगारांना अनेक सोयी-सवलती मिळवून दिल्या. रविवारची साप्ताहिक सुट्टी मिळवून दिली. याच लढ्यातील मागण्यांना लक्षात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाचे कामगार कायदे निर्माण केले, संपाचा अधिकार मिळवून दिला. परंतु श्रमिकांच्या क्रांतीलढ्यातील या महापुरुषांचे दिशादर्शक विचार देशातील प्रस्थापित कामगार संघटनांनी दुर्लक्षित केल्यामुळे कामगार क्रांतीचे चाक आज अर्ध्यावरच थांबले आहे.

महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना परिवर्तनवादी महापुरुषांच्या क्रांती विचारांना पुढे नेण्यासाठी ४५ वर्षांपूर्वी निर्माण झाली. याच संघटनेने चालविलेल्या लढ्यामुळे बहुजन वीज कर्मचाऱ्यांना सामाजिक व आर्थिक समतेचे लाभ प्राप्त होऊन स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग प्रशस्त झाला. संविधानाच्या चौकटीतून या संघटनेने जे लढे उभारले त्याचे अनेक सकारात्मक परिणाम दिसून आले. वीज कंपन्यातील कामगारांचा राजकीय स्वार्थासाठी होणारा दुरुपयोग थांबवून खऱ्या शत्रूची व खऱ्या संकटाची ओळख करून देण्यामध्येही या संघटनेची एक महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे.

केंद्र सरकारने मागील वर्षी काढलेल्या अधिसुचनेनुसार महाराष्ट्रातील ज्यास्त महसुल मिळवून देणारे वितरण विभाग शोषक भांडवलदारांच्या ताब्यात देण्याची कार्यवाही वीज कामगारांच्या एकजुटीने तूर्त थांबली असली तरी संकट अजूनही टळलेले नाही. चुकीच्या नेतृत्वाखाली संप केल्यावर कामगारांची कशी फसगत होते हे राज्यातील कर्मचाऱ्यांनी अलिकडच्या काळात अनुभवले आहे. अशा परिस्थितीत सर्व प्रकारच्या कामगार लढ्याचे नेतृत्व करण्याची जबाबदारी फुले-आंबेडकरी विचारांच्या कामगार संघटनांनी स्विकारण्यासाठी संघटनेच्या कार्यकर्त्यांनाही तेवढेच आक्रमक होण्याची गरज आहे. वीज कर्मचाऱ्यांना मागील पगारवाढ ज्यास्तीत-ज्यास्त प्रमाणात आपल्या अभ्यासू व आक्रमक भूमिकेने मिळवून देण्यात संघटनेस यश प्राप्त झाले. तशीच भूमिका संघटना येणाऱ्या पगारवाढीमध्येही मांडणार आहे.

कॅडरवाद, वेतनगटवाद, अभियंता-कामगार वाद या माध्यमातून वीज कर्मचाऱ्यांमध्ये अंतर्गत कलह निर्माण करून व्यवस्थापनास सोयीचे वातावरण निर्माण होण्यासाठी कामगारांमध्ये फूट पाडणाऱ्या संघटनांच्या गर्दीत सर्व श्रेणीतील बहुजन कर्मचाऱ्यांना सावध करण्यासह त्यांचेमध्ये बंधुभावाचे वातावरण निर्माण करण्यास संघटनेने मोठी सफलता प्राप्त केली आहे. हाच बंधूभावाचा विचार या देशातील कामगारांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी अग्रेसर होणार आहे. म्हणूनच समता व न्यायवादी कामगार लढा ज्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या असिम निष्ठेतून व त्यागातून यशस्वी होतो; त्या परिवर्तनशिल विचारांच्या कामगार संघटनेच्या आगामी वाटचालीसाठी कोल्हापूर येथे संपन्न होणारे हे राज्यव्यापी द्विवार्षिक अधिवेशन क्रांतीचे चक्र पूर्ण फिरविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## कार्यक्रम पत्रिका

उद्घाटन समारोह : **शनिवार, दि.२९ एप्रिल २०२३, सकाळी ११.०० वाजता**
उद्घाटक : **मा. दिनेश वाघमारे,** (भा.प्र.से.), अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण, मुंबई.
प्रमुख पाहुणे : **मा. विजय सिंघल,** ( भा.प्र.से.), अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, मुंबई.
**डॉ. पी. अनबलगन,** (भा.प्र.से.), अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महानिर्मिती, मुंबई.
प्रमुख उपस्थिती : **मा. जे. एस. पाटील,** राष्ट्रीय अध्यक्ष, स्वतंत्र मजदूर युनियन.
**मा. ए. व्ही. किरण,** राष्ट्रीय महासचिव, स्वतंत्र मजदूर युनियन.
**डॉ. के. पी. स्वामीनाथन,** समन्वयक, स्वतंत्र मजदूर युनियन, दक्षिण भारत.
कार्यक्रमाचे अध्यक्ष : **डॉ. संजय घोडके,** केंद्रिय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन.

### चर्चासत्र-१ : शनिवार, दिनांक २९ एप्रिल २०२३, दुपारी १२.३० ते २.३०

सहभाग : **डॉ. जी. मोहन गोपाल,** प्रसिद्ध अधिवक्ता व नॅशनल लॉ अॅकेडमी, नवी दिल्ली चे माजी संचालक
विषय : **शासकीय सेवेतील प्रतिनिधित्वाची संविधानिक संकल्पना, सद्यस्थिती व पुढील आव्हाने**

**डॉ. लक्ष्मण यादव,** सामाजिक विचारवंत, दिल्ली विद्यापीठ.
विषय : **फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित कामगार चळवळीची आवश्यकता**

**मा. नवीन कुमार,** संचालक चॅनल-19 इंडिया, नवी दिल्ली.
विषय : **आंबेडकरी चळवळ मजबूत करण्यासाठी माध्यमे व सामाजिक माध्यमांची उपयुक्तता**

अध्यक्ष : **मा. जे. एस. पाटील,** राष्ट्रीय अध्यक्ष, स्वतंत्र मजदूर युनियन.

### चर्चासत्र-२ : शनिवार, दिनांक २९ एप्रिल २०२३, दुपारी ३.३० ते ५.३०

सहभाग : **डॉ. सुभाष देसाई,** प्रसिद्ध विचारवंत, कोल्हापूर ▪ विषय : **मानव मुक्तीच्या लढ्यामध्ये माणगाव परिषदेचे महत्त्व आणि समानतेच्या तत्त्वाची वास्तविकता**
**डॉ. विनोद पवार,** सामाजिक विचारवंत, सांगली ▪ विषय : **भारतीय संविधानासमोरील आव्हाने**
**मा. गौरव सोमवंशी,** आर्थिक बदलांचे अभ्यासक, औरंगाबाद ▪ विषय : **बदलत्या आर्थिक व्यवस्थेमध्ये सामाजिक न्यायाचा लढा**
अध्यक्ष : **मा. प्रेमानंद मौर्य,** सरचिटणीस, म.रा.मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन

### रविवार, दिनांक ३० एप्रिल २०२३, सकाळी १०.३० ते दुपारी १२.३०

चर्चासत्र : विषय : **वीज कंपन्यांच्या लोकाभिमुख सक्षमीकरणासाठी व्यवस्थापन व कर्मचाऱ्यांची भूमिका**
सहभाग : **मा. प्रसाद रेशमे,** संचालक (प्रकल्प व मा.सं.), महावितरण कंपनी, मुंबई
**मा. नासिर कादरी,** संचालक (प्रकल्प), महापारेषण कंपनी, मुंबई
**मा. एस. एम. मारूडकर,** संचालक (संचलन), महानिर्मिती कंपनी, मुंबई
अध्यक्ष : **डॉ. संजय घोडके,** केंद्रिय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन

### कार्यकर्ता प्रबोधन व संघटनेच्या आगामी वाटचालीसाठी दिशा-दिग्दर्शन : रविवार, ३० एप्रिल २०२३, दुपारी १२.३० ते २.३०

मार्गदर्शक : **मा. जे. एस. पाटील,** राष्ट्रीय अध्यक्ष, स्वतंत्र मजदूर युनियन ▪ विषय : **कामगार चळवळीमधील कार्यकर्त्यांची जबाबदारी**
मार्गदर्शक : **मा. विजयकांत पानबुडे,** अप्पर कामगार आयुक्त (निवृत्त), महाराष्ट्र शासन ▪ विषय : **कामगार कायदे व त्यांची उपयुक्तता**
मार्गदर्शक : **मा. एन.बी.जारोंडे,** राष्ट्रीय उपाध्यक्ष, स्वतंत्र मजदूर युनियन ▪ विषय : **कामगार चळवळीतील फुले-आंबेडकरी प्रेरणा**

### संघटनेच्या कार्याचा आढावा व पुढील वाटचालीबाबत संकल्प : रविवार, ३० एप्रिल २०२३, दुपारी २.३० ते ४.३०

अध्यक्ष : **मा. प्रेमानंद मौर्य,** सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन
सहभाग : **केन्द्रिय पदाधिकारी,** महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन
संचलन : **मा. एस. के. हनवते,** कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन
समारोप : **मा. वाय.के. कांबळे,** मुख्य संघटक, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन

**सायंकाळी : ५.०० वाजता – समारोप**

### विनित

| डॉ.संजय घोडके | एस.के. हनवते | प्रेमानंद मौर्य | वाय. के. कांबळे | संजय मोरे | दिनेशकुमार कांबळे | ए. पी. शिंदे |
|---|---|---|---|---|---|---|
| अध्यक्ष | कार्याध्यक्ष | सरचिटणीस | मुख्य संघटक | उपसरचिटणीस | उपसरचिटणीस | उपसरचिटणीस |

केंद्रिय उपाध्यक्ष : मधुकर कांबळे, किशोर अहिवळे, सिद्धार्थ पाटील, सी. एस. जनबदकर, एस. एस. आडे, पी. एल. हेलोडे, एन. डी. पोटभरे
आर. एस. कांबळे, सुरेश पाचंगे, ए. के. मेहरे, सूर्यकांत जनबंधू, रमेश कांबळे, बी.एल. वडमारे, निलेश गजभिये, संजय कांबळे,
जीवन गायकवाड (केंद्रिय कोषाध्यक्ष), बंडू शंभरकर (केंद्रिय प्रसिद्धी सचिव),
महिला प्रतिनिधी : निशा चौधरी, जया चोपकर, अंजली बन्सोड

## महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन

मुख्य कार्यालय : ३१४, निलकमल कॉम्प्लेक्स, महाजन मार्केट, सिताबर्डी, नागपूर-१२.